# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
## Maharashtra Electricity Regulatory Commission


क्र : मविनिआ/माअअ/८७/२०१७/ 4540 दि. २७.१०.२०१७

प्रति,
ॲड.राजेश सु.दाभोळकर,
२/३४, कलावती भुवन, शांतीलाल कंपाऊंड,
जवाहर नगर, खार (पूर्व),
मुंबई - ४०००५५.

विषय :- आपला दि. १३.१०.२०१७ रोजीचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. १३.१०.२०१७ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. १६.१०.२०१७ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No. | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| | मुंबई उपनगरात वीज पुरवठा करण्यासाठी . . . . .<br>1) रिलायन्स एनर्जी कंपनीसोबत करण्यात आलेल्या License नुतनीकरणाच्या कराराची छायांकित प्रत मिळावी. | रिलायन्स एनर्जी कंपनीसोबत License नूतनीकरणाचा कोणताही करार झालेला नाही. दि. 11 ऑगस्ट 2011 रोजी आयोगाने प्रकरण क्र. 65/2011 च्या आदेशान्वये रिलायन्सला License मंजूर केले आहे. |
| | 2) सदर License नुतनीकरण करताना ज्यांनी आक्षेप घेतला होता त्या कागदपत्रांची तसेच त्या आक्षेपांवर घेण्यात आलेल्या सुनावणी तसेच त्यावर देण्यात आलेल्या आदेशांची छायांकित प्रत मिळावी. | आक्षेपांची कागदपत्रे आयोगाच्या रेकॉर्डमध्ये (केस फाईल क्र. 65/2011) उपलब्ध आहे. तसेच सुनावणीनंतर आयोगाने दिलेला आदेश मंजूर (प्रकरण क्र. 65/2011) मंजूर केलेल्या परवान्यासह आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. **(URL ID attached herewith)** |
| | 3) सदर License नुतनीकरण करताना राबविण्यात आलेल्या प्रक्रियेची सारांश माहिती मिळावी. तसेच सदरबाबत तयार करण्यात आलेल्या धारिणीचे निरिक्षण (File Inspection) मिळावे. | सदर लायन्सन्स मंजूर करताना राबविण्यात आलेल्या प्रक्रियेची सारांश माहिती आदेश क्र. 65/2011 मध्ये देण्यात आली आहे व आदेश संकेत स्थळावर उपलब्ध आहे. File Inspection करिता आयोगाच्या रेकॉर्ड रुममधील फाईल क्र. 65/2011 उपलब्ध आहे. |

सदर उपलब्ध करुन दिलेली माहितीबद्दल आपले समाधान न झाल्यास आपण प्रथम अपीलीय अधिकारी श्री अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई यांचेकडे सदर पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसाच्या आत प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,
हेमलता मोती २७/१०/२०१७
(हेमलता मोती)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी